Vol 3 Issue 11 Aug 2014

ISSN No : 2249-894X

# Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra
Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

Review Of Research
Vol. 3 | Issue. 11 | Aug. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X
Available online at www.ror.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# कवी विंदांच्या कवितांच्या चरित्रपर वाचन

**राजशेखर शिंदे**

मराठी विभाग ,दयानंद कॉलेज,सोलापूर.

**सारांश :**

चरित्रात्मक अभ्यास ही एक अभ्यासपध्दती आहे. समीक्षापध्दत आहे.परंतु ती विश्वासार्ह नाही असे सांगितले जाते.ती साहित्याच्या सर्जनशीलतेवरच मर्यादा आणते,असा एक मोठा आक्षेप या पध्दतीवर घेतला जातो.त्याचे कारण असे की, लेखकांच्या समकालीन व उत्तरकालीन वाचकांना लेखकांचे संपूर्ण चरित्र ज्ञात नसते. ते ज्ञात नसते. ते ज्ञात असावे अशी अपेक्षा करणेही रास्त नसते. लेखकाच्या वैयक्तिक जीवनातील काही अनुभव ,घटना ,प्रसंग साहित्यकृतींमधून आविष्कृत होतात तेव्हा लेखकाचे अनुभव आणि कलाकृतीमध्ये आविष्कृत झालेले अनुभव यांचा अन्योन्य संबंध उरत नाही.त्या कृतीला स्वतंत्र आणि अनन्य साधारण असे व्यक्तिमत्व प्राप्त होते. परंतु अशा कृतीच्या अभ्यासात बहुश :फसगत झालेली दिसून येते. त्या एकमेकांचा अन्वय लावला जाऊन लेखकाच्या प्रातिभव्यक्तिमत्वावरच काही प्रश्न उपस्थित केले जातात .यामुळे चरित्रात्मक पध्दतीवर मर्यादा येतात.साहित्यकृतीमधून काही चमकते असेल तर त्याला चरित्रात्मक अभ्यासपध्दतीची जोड देऊन आणखी लकाकी देण्याचा प्रयत्न व्हायला पाहिजे. कवी,लेखकांच्या प्रतिभेच्या मगदुरावर प्रश्न उपस्थित झाले नाहीत तर या पध्दतीचे स्वागतच व्हावे .काही सीमित अर्थाने चरित्रात्मक अभ्यास पध्दत उपयुक्त ठरते.लेखकाची जीवननिष्ठा , वैयक्तिक तत्वप्रणाली व त्याची साहित्यावरील अनन्य निष्ठा या पध्दतीमुळे अधोरेखित होते.या पध्दतीने साहित्याचे संबंध आकलन आणि विश्लेषण शक्य नसते. त्यामुळे साहित्याच्या इतर अभ्यास पध्दतींना ही एक पूरक पध्दत ठरते . विंदांचे शिक्षण कोल्हापुरात वार लावून झाले . लोकांची उदारता नि अंत : करणाची विशालता त्यांनी अनुभवली होती.देण्याचे बीजारोपण त्यांच्या त्या वयातच झाले असावे . ही परतफेड जरूर नाही ; उतराई तर नाहीच. तो युगानुयुगाचा मनुष्यधर्म असतो. तो स्वभाव ; तो धर्म विंदांनी पाळला . तेवढे त्यांच्यात औदार्य नि दातृत्व होते. प्रस्तुतच्या लेखात या पध्दतींनुसार विंदाच्या वैयक्तिक व वाङ्मयीन व्यक्तिमत्वाचे आकलन करण्याचा प्रयत्न केला आहे.

## प्रस्तावना :

विंदाच्या कवितेमध्ये कितीतरी वैयक्तिक गोष्टी उतरलेल्या आहेत.त्यांची मथुआत्ते,परशुकाका ,दादा ,दारिद्रय असे अनुभव कवितेत पसरलेले आहेत. "आपल्याला अनोळखी असणाऱ्या किती वनस्पती त्यांनी पाहिल्या? आता हे सगळे त्यांच्या लेखनात कुठे कुठे आहे हे शोधणे , ही कदाचित जिनेटिक फॅलसी ठरेल. पण करंदीकर लहानपणापासून एका वेगळया जगात वावरले; आणि त्यामुळे पुढे त्यांच्या कवितेला एक स्वतंत्र चेहरा आला , यात शंका नाही . "डॉ. विजयाबाई राजाध्यक्ष यांचे हे विधान फार महत्वाचे आहे. त्या पुढे म्हणतात, " असे किती तरी अनुभव . ते कवितेत किती वेगळया प्रकारे आले आहेत ? कवीच्या वैयक्तिक आयुष्याशी असलेली नाळ तोडून ते कवितेत पसरलेले आहेत .कथा – कांदबरी – नाटकात याच सामग्रीचे काय झाले असते?करंदीकरांना विचारले पाहिजे." (बहुपेडी विंदा; 2005:60) हे समजून घेण्यासाठी विंदांच्या आयुष्यातील व त्यांच्या व्यक्तिमत्वाचे अविभिन्न अंग असलेल्या 'घेता' , तरूणपणी ' या रचनांचे विश्लेषण करू , म्हणजे विंदांच्या स्वभावधर्मावर व एकंदर व्यक्तिमत्वावर अधिक प्रकाश टाकता येईल. 'तरूणपणी ' ही

विंदांची सुप्रसिध्द विरूपिका आहे . या विरूपिकेमधून त्यांनी समकालीन ढोंगी समाजसुधारकांवर,राजकारण्यांवर ब्रम्हास्त्र सोडलेले आहे. विंदा निरपेक्षेने वागले नि निर्मळपणे जगले.त्यामुळे 'तरूणपणी सारखी विरूपिका ते लिहू शकले . या विरूपिकेत त्यांचा कृतिशील राष्ट्राभिमान दडलेला आहे. समाजमनस्क असा सुधारक लपलेला आहे. या विरूपिकेतल्या अनेक संदर्भाचा शोध घेऊ.

या विरूपिकेत येणारे सारे संदर्भ वैयक्तिक असे आहेत.विंदा म्हणतात , "कोकणामधील खेडेगावामधील हिंदू वातावरणात मी वाढलेला असल्यामुळे त्यावेळी मी सावरकर,राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व आर्य समाज यांना मानणारा होतो ; परिणामी बी.ए.ची परीक्षा संपल्यावर मी 1939 च्या भागानगरच्या सत्याग्रहात सहभागी झालो, काही महिने सक्तमजुरीची शिक्षा भोगली आणि औरंगाबादच्या तुरूंगात असताना लाठीहल्ल्याचा प्रसादही घेतला . " (उद्‌गार : 1996:60) हैद्राबाद संस्थानातील निजामशाहीविरूद्ध भागानगर सत्याग्रह झाला. एका तुकडीत सामील होऊन करंदीकर पैठणला गेले . गोदावरी नदीपलीकडे देवळासमोर भाषण देत असताना पन्नास – साठ लोकांच्या तुकडीला निजामी पोलिसांनी अटक केली. त्यांना सात महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा झाली. औरंगाबादच्या हर्सूल कारागृहात त्यांनी आर्य समाजास सत्याग्रहींसमवेत शिक्षा भोगली. आर्य समाजी सत्याग्रहींना भाकरीमध्ये सिमेंट असल्याचा संशय आल्याने पाणी पिण्याच्या चंबूमध्ये वाळू भरून तो चंबू तुरूंगाधिकाऱ्याच्या कार्यालयावर फेकू लागले.ही गोष्ट करंदीकरांना अविवेकी वाटली. संतापलेल्या सत्याग्रहींना' असे चंबू फेकणे गैर आहे; आपण त्यासाठी सत्याग्रह करू असे इंग्रजीमधून समजावू लागले. परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली तुरूंगात पुरेसा फौजफाटा नव्हता.अधिकाऱ्याच्या मदतीला बाहेरून अल्लमा मश्रिकींच्या खाकसार संघटनेचे स्वयंसेवक आले. आल्या आल्या त्यांनी लाठीहल्ला केला.खाकसरांना करंदीकर इंग्रजीमधून काय बोलत होते कसे समजणार ? करंदीकरांनाही लाठीप्रसाद मिळाला ! त्या सर्वासोबत दंडाबेडीची ठोकण्यात आली. या दंडाबेडी कैद्यांना हैद्राबादच्या कारागृहात नेण्यात आले. तिथे हॉलिन्स हे शेक्सपिअर प्रेमी तुरूंगाधिकारी होते.तुरूंगाच्या तपासणीत करंदीकरांनी त्यांच्याशी अस्खलित इंग्रजीत संभाषण केले. पुढे निजामशाहीविरूद्धचे सत्याग्रह मागे घेण्यात आले आणि त्या बांधवांची सुटका झाली. तेव्हा विंदानी एकंदर चार महिन्यांची शिक्षा भोगली.

याच भागानगर सत्याग्रहामुळे विंदांवर एक अनिष्ट आपत्ती ओढवली. राजाराम कॉलेजमध्ये (कोल्हापूर) इंग्लिश विषयात प्रथम येणाऱ्यास काही काळ टयूटरशिप मिळत असे. करंदीकर पहिले आले होते. मात्र तेव्हा ते तुरूंगात होते. ती टयूटरशिप गेली दोन नंबरकडे.

राजाराम कॉलेजमध्ये शिकत असताना त्या वेळच्या मानाने काहीएक वेगळे कार्य करंदीकरांनी केले होते. हरिजनांना हॉटेलात प्रवेश देण्यासंबंधीच्या चळवळीतही ते सहभागी होते. त्या काळात करंदीकर वार लावून शिकत होते. चळवळीतही ते सहभागामुळे त्यांचे काही घरचे वार सुटले! (रास : 1998 : 35)

पुढे तासगावला (जि. सांगली) बेचाळीसच्या चळवळीत काहीसे कार्य केले. दुसरे महायुद्ध सुरू होते. खेडयापाडयांतून विशेषतः हरिजनांचीच सैन्यात भरती होत होती. हे गोष्ट बुद्धिवादी आणि प्रगत विचारांच्या करंदीकरांनी पटलीनाही. खेडोपाडी जाऊन ''आपल्या मुलांना परकीयांसाठी लढायला व मरायला पाठवू नका'' असे सांगू लागले. (रास :38)

त्यानंतर खूप पुढे त्यांनी 1976 साली एस. आय. इ. एस्. कॉलेजमधून (मुंबई) स्वेच्छानिवृत्ती घेतली. राजीनामापत्रात स्वेच्छानिवृत्ती असे म्हटल्याने विंदांना पेन्शन बसली नाही. त्याच सुमारास स्वातंत्र्यसैनिकांना सरकारने पेन्शन सुरू केले. करंदीकरांना अनेकांनी याबद्दल सांगितले. औरंगाबादच्या अनंतराव भालेकरांनी अर्ज करण्याचा आग्रह धरला. (वसंत बापटांनी पेन्शनीचा अर्ज आणून दिला, तो करंदीकरांनी फाडून टाकला, अशी वंदता आहे.) विदांनी राजीनामा दिला तेव्हा त्यांची दोन मुले शिक्षण घेत होती.

या सर्व कार्याबद्दल व विशेषतः भागानगरच्या सत्याग्रहाबद्दल विंदांची प्रतिक्रिया फार मौलिक आहे. ते म्हणतात, ''तरूणवणी देशासाठी अर्पण केलेली एक पाकळी. त्यामुळे माझं काही नुकसान झालेलं नाही. माझं शिक्षण पूर्ण झालं. नोकरी आहे मी अन्नाला महाग नाही. तेव्हा हया तुरूंगासाठी मी स्वातंत्र्यसैनिकाचं पेन्शन घेणार नाही.'' (रास : 102) त्यांच्या या त्यागी वृत्तीचे साजरे दर्शन 'तरूणपणी' या विरूपिकेत होते. त्या अनुभवाचे एक वेगळेच काव्यविधान विंदांनी केले आहे. ते असे–

'' तरूणपणी त्याने एकदा दर्यामध्ये लघवी केली.  
आणि आपले उर्वरित आयुष्य त्यामुळे दर्याची उंची किती वाढली  
हे मोजण्यात खर्ची घातले'' (विरूपिका : 1981 : 16)

या विरूपिकेत विंदांचे विराटपण ; समाजमनाच्या विकलांगतेचे दर्शन घडते. समष्टीभाव संपुष्टात येवून व्यष्टीभाव पुष्ट, पुंड होत गेला. सामाजिक मूल्ये, राजकीय तत्त्वे, नियम अगदी सहजगत्या आपल्या बाजूला वळून घेणारे राजकारण, ढोंगी समाज कारण दृष्टीस पडत आहे. त्याच समाजात विंदासारखा कवी काय नाकारतो आणि कशासाठी नाकारतो हे फार चिंतनीय आहे. समाजाच्या विरूपतेचे, कुरूपतेचे, विद्रुपतेचे दर्शन यात आहे. कल्याणकारी राज्यात सरकार आपणच केलेल्या कार्याची प्रसिद्धीसाठी कोटयावधी रूपये खर्च करते तेव्हा विंदांची 'तरूणपणी' ही विरूपिकाच दृष्टीसमोर येते. या पार्श्वभूमीवर विंदाच्या जाज्वल्य उर्ज्वस्वल देशाभिमानाचे, तीव्र समाजभानाचे रूप दिसून येते.

अफाट जीवनसागरात कधीकाळी केलेली एखादी नगण्य गोष्ट आयुष्यभर जोपासली जाते; जोजविली जाते.

त्या गोष्टीनंतर काहीही केलेले नसते; परंतु बडेजाव मात्र संबंध सृष्टीचा त्राता आपण असा असतो. विंदाच्या भाषेत समुद्रात लघवी करून समुद्राची उंची मोजणे होय! विंदांनी तर काय काय सांगू नये? 1976 साली स्वेच्छा निवृत्ती स्वीकारली ती मुळातच दोन तरूण प्राध्यापकांची नोकरी जाऊ नये म्हणून ! बदललेल्या नियमांनुसार इंग्रजी विभागातील हे प्राध्यापक बेकार झाले असते. विंदांनी त्यांना आयुष्याची गांजी दिली. ही घटना त्यांनी सांगावी की भागानगर सत्याग्रह प्रकरण की अन्य गोष्टी? काय सांगून समुद्राची उंची मोजावी?

करंदीकरांनी 'घेता' ही सुप्रसिद्ध कविता 11.7.1956 रोजी लिहिलेली आहे. ती भारतीय संस्कृतीचे निर्देश करणारी आहे. आणि तशीच ती एकप्रकारचे शिकवणही देणारी आहे. आपल्या गरजा भागून उरलेले असेल ; किंवा रूपयातील आणे—दोन इतरांसाठी असावेत ही जाणीव असली पाहिजे, ही आपली सामाजिक शिकवण आहे. तसेच आपण जी मदत दुसऱ्यांना करतो.मदतीचा हात दुसऱ्यांना दिल्यानंतर त्याचा कोठे उल्लेखही करू नये. मराठीमध्ये सुभाषित आहे की उजव्या हाताने दान केलेने डाव्या हाताला कळू नये. यात खरे दातृत्व आहे. अन्यथा त्या दवंडी पिटणाऱ्या दानाला काहीएक अर्थ उरत नाही. समाजमनावर अशा रितींपासून संस्कार होत नाहीत. न देणाऱ्या हातांना घेण्याचीच सवय जडलेली असेल तर देण्याची कधीतरी सवय जडून जाते . घेण्याइतपत देण्याची सवय असावी हा मनुष्यधर्म आहे. आणि तो निसर्गधर्माला अनुसरून असावा विंदांच्या 'घेता' या कवितेमधून 'मनुष्याला मनुष्यातूनही काढून अलौकिक देवत्त्वाकडे नेण्याची क्रिया दिसून येतें.

विंदाची मनुष्यातून उठून देवत्वाकडे जाण्याची आस आधीपासूनची होती. तिला परिपूर्ती लाभत गेली त्यांच्या उत्तरायुष्यामध्ये, भारतीय संस्कृतीमध्ये, कशाचाही जास्त सोस वा लोभ धरू नये— परिग्रहाच्या मागे लागू नये असे सांगितलेले आहे. आपल्या संतमहंतांची शिकवण हीच आहे. 'खायला कोंडा नि उशाला धोंडा' यामधून आळशी प्रवृत्ती निदर्शन होत नाही किंवा व्यावसायिक वृत्तीचा अवरोध नाही.

व्यक्तीला लागेल तेवढे पर्यायाने कुटुंबाला पुरेल इतकेच पहावे. अधिक्याचा संचय करता कामा नये. म्हणून देणाऱ्याने ध्यावे, घेणाऱ्याने घ्यावे. आणि घेत घेतच देत्या  हातांचे गुणधर्म अगिकारावेत हे विंदा 1956 सालीच काव्याविधानातून सांगतात. आधी वागण्याचे कथन करून नंतर ते तसे वर्तन करतात. वानप्रस्थाश्रमी जीवन विंदा जगतात. एका अर्थाने त्यांचे मानवतेवरच अलोट प्रेम व्यक्त होते. कसे ते त्यांच्या एका भाषणातून व्यक्त झाले आहे.त्यामध्ये ते म्हणतात , "जनस्थान पुरस्कार" हा मराठी  लेखकाला मिळणारा शिखर सन्मान आहे. असे सुरुवातीला म्हणालो;  पण मी समान्यतः कवी असलो तरी विशेषत्वाने कवी आहे. आणि माझ्यातील कवीच्या दृष्टीने या पुरस्काराचे महत्त्व शिखर सन्मानहूनही पुष्कळ अधिक आहे. 'जनस्थान पुरस्कार' म्हणजे गोदावरीच्या तीरावर कुसुमाग्रजांच्या पायाशी मिळालेला पवित्र महाप्रसाद अशीच माझी भावना आहे. अंतिमतःजनता जनार्दनाच्या कृपेने लाभलेला हा महाप्रसाद पुन्हा जनतेपर्यंत पोचण्याचे श्रेय मला लाभले तर त्याहून मोठे साफल्य ते कोणते ? महाराष्ट्रातील समाजमनावर भूकंपाचा वज्राघात होऊन अनेकांची घरेदारे व संसार  उद्वस्त  झाले असता असे काही करण्याची निकड अधिकच जाणवते. अनाथ झालेल्या चिमण्या पाखरांसाठी घरटी बांधण्याचे काम सुरु असताना एका काडीलाही अर्थ प्राप्त होतो. पण आज हे काडीचे श्रेय मला लाभले असले तरी ते शेवटी कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या व निवड समितीच्या उदार रसिकसतेमुळे. हेही आपण जाणताच असो, "जनस्थान पुरस्कार म्हणून मला मिळणारी एका लाखाची संबंध रक्कम "मुख्यमंत्री, भूकंप सहाय्यता निधी' ला देण्याचा संकल्प आज मी इथे कुसुमाग्रजांच्या पायाशी सोडतो" (उदगार :29) ही जी भूतदया, अपार करुणा आहे ती विंदांच्या ठायी कैकवेळा दिसून आली. तिचा प्रत्यय अनेकांनी घेतला. त्यांच्या ठिकाणी असलेली बाल्यसुलभ निरागस वृत्ती ओसंडताना दिसते. कवी वसत बापटांचा दैनिक 'सकाळ'(पुणे) मधील साधरणपणे 1994 मध्ये विंदांवरला लेख वाचल्याचे स्मरते. नेमकी तारीख नाही आठवत. त्यामध्ये बापट म्हणतात की, 'मी विंदाला म्हटले—जनस्थानाचा चांगला घसघशीत एक लाखाचा पुरस्कार मिळालाय तर तू त्या लाखाचे काय करणार ? तर विंदा म्हणाला 'मी पुण्यात फ्लॅट घेणार ! मी त्याला म्हटलेय होय होय ! अगदी तीन तीन चा फ्लॅट घे !" आणि रोज सकाळी लोटा परेडसाठी पुण्याला येत जा ! तर प्रत्यक्ष पुरस्कार स्वीकारताना ती रक्कम त्यांनी मुख्यमंत्र्यांनाच दिली !'

विंदांची 'घेता' कविता फार मोलाची वाटते. कारण घेणाऱ्याने काय घ्यायला पाहिजे? म्हणजे जे अक्षं य अक्षर असेल मन संतृप्त होईल असेच घ्यायला पाहिजे. हे विंदा सांगतात. हिरव्यापिवळ्या माळाकडून तशीच शाल घ्यावी, सह्याद्रीकडून छातीसाठी ढाल घ्यावी, वेड्यापाशी  ढगाकडून तशीच ढाल घ्यावी,रक्तामधल्या प्रश्नांसाठी पृथ्वीकडून होकार घ्यावा , उसळलेल्या दर्याची आभाळ, भरल्याशा  भीमेकडून तुकोबाची माळ घ्यावी हे विंदा सांगतात विदांचे 'घेणे' साधे नाही;ते संबध विश्वच घ्यायला सांगतात . बदल्यात देणे किती आहे अल्पस्वल्पच आहे. आणि देणे हातचे आहे; देणे मन व्यापून राहणारे आहे, उदार उन्नत करणारे आहे . देत राहणेसुद्धा मनाला संतोष करणारे तोषविणारे, प्रसंगी तृप्त तृप्त करणारे असते. म्हणूनच विंदा म्हणतातः

"देणाऱ्याने देत जावे;
घेणाऱ्याने घेत जावे;
घेतां घेतां एक दिवस
देणाऱ्याने हात घ्यावे!" (धृपद : 2004:62)

विंदाचे शिक्षण कोल्हापुरात वार लावून झाले. लोकांची उदारता नि अंतःकरणाची विशालता त्यांनी अनुभवली

होती. देण्याचे बीजारोपण त्यांच्या त्या वयातच झाले असावे. ही परतफेड जरूर नाही; उतराई तर नाहीच. तो युगानुयुनाचा मनुष्यधर्म असतो. तो स्वभाव;तो धर्म विंदानी पाळला. तेवढे त्यांच्यात औदार्य निदातृत्व होते. विंदांच्या स्वभावाच्या काही आठवणी गंगाधर गाडगीळांनी सांगितलेल्या आहेत. गाडगीळ सांगतात की, "करंदीकरनं पैशाची ओढाताण बरीच अनुभवली होती. पै–पैची काटकसर करायची कोकणातील वृत्ती त्याच्या अंगात मुरलेली होती. त्यामुळे पैसे खर्च करायचा प्रसंग आला की, त्याची मुठ अगदी घट्ट बंद व्हायची........हातातला पैसा सोडायला विंदा त्या काळात तयार नसे; पण अनेकदा त्याची माणुसकी जागृत व्हायची. एखाद्या भिकाऱ्याला अगर गरजूला चार पैसै द्यावे, मदत करावी असं त्याला मनापासून वाटायचे हातातला पैसा सोडू नये.

असंदेखील त्याला तितकंच मनापसून वाटायचं अशा वेळी तो बापटाला अगर पाडगावकरला म्हणायचा, ' अरे, द्यारे त्याला कोणीतरी चार आठ आणे. पोटभर खाऊ दे तरी . "(आठवणींच्या गंधरेखा : 1993:51 / 52) ही अपार करुणा होय. तेव्हा त्याच्याकडेच काही उरलेले नसायचे.

भिकाऱ्याला कोणीतरी धारे, चार – आठ आणे म्हणणाऱ्या विंदांनी लाखो रुपये अगदी सढळ हाताने, प्रसन्नपणे समाजाला दिले.सौ.सुमा करंदीकर (विंदांच्या पत्नी ) म्हणतात, " मराठवाडा साहित्य परिषदेतर्फ दिला जाणारा पहिला कविराज कुसुमाग्रज पुरस्कार ' 1987 मध्ये मिळाला. त्यावेळी मराठवाडयात दुष्काळ पडला होता. पारितोषिकाची सर्व रक्कम मिळाल्याबरोबर तिथेच करंदीकरांनी ' मराठवाडा दुष्काळ फंडा ' च्या निधीला देणगी दिली. पारितोषिकाची सर्व रक्कम प्रथम ह्याचवेळी ह्यांनीसामाजिक कार्याला दिली. ह्याआधीची अनेक पारितोषिकांची रक्कम आमच्या ओढगस्तीच्या संसारासाठी आवश्यक होती व ती संसारासाठी वापरली गेली.''(रास:114 ) 1991 साली भारतीय कवितेसाठी ' कबीर सन्मान ' हा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. रोख रक्कम दीड लाख रुपयांचातो पुरस्कार . ती रक्कम विंदांनी सामाजिक कार्य करणाऱ्या चार संस्थाना दिली. 1993 चा ओरिसा स्टेट कॉन्सिल ऑफ कल्चर तर्फ ' कोणार्क सन्मान 'मिळाला. श्रेष्ठदर्जाच्या कलावंताला हा पुरस्कार देण्यात आला. परंतु 1993 साली साहित्यिकाला पाहिल्यांदाच हा पुरस्कार देण्यात आला. विंदांनी पुरस्कारातून मिळलेली पन्नास हजाराची रक्कम त्यानीं मुंबई विद्यापीठाच्या ' मराठ भाषा भवन ' साठी दिली. 1997 साली महाराष्ट्र फाउंडेशनचा , स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवानिमित ' भारतीय कीर्तीच्या मरठी लेखकाला सव्वा दोन लाखाचा पुरस्कार मिळाला. ' " ही सर्व रक्कम आपण संततीनियमनाच्या कार्याला व त्याला पूरक ठरणाऱ्या इतर कार्याला देणार असल्याचे सांगून टाकले. पैकी दीड लाख रुपये श्रीमती नथीबाई ठाकरसी महिला विद्यापीठाला दरसाल ' आर . डी. कर्वे मेमोरिअल लेक्चर ! ठेवण्यासाठी आणि पन्नस हजार ' फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया ' पंचवीस रूपये 'सेंटर फॉर द स्टडी ऑफ सोशल चेंज ' या संस्थाच्या , कुटुंबनियोजनाच्या कार्यासाठी दिले. गेले. " ( रास : 116 / 17 ) आणि 2003 सालचा ज्ञानपीठाचा पुरस्कार मिळाला.त्या पुरस्काराची पाच लाख रुपयांची रक्कम विंदांनी अशीच विभागणी करून सामाजिक कार्य करणाऱ्यां संस्थांना दिली. ह्या देणग्यांबद्दलचे विंदांचे मत सौ. सुमा करंदीकरांनी सांगितलेले आहे. " ह्या देणग्यांबद्दल हे म्हणतात.: ' मी काहीच दिलेलं नाही; समाजाने दिलेले काही पैसे समाजाला परत दिले; आमच्या दोघांच्या स्वतःच्या श्रमाच्या कमाईतून फक्त पंचवीस हजार रुपये डॉ. भीमराव गस्ती देवदासींसाठी सुरु केलेल्या संस्थेला दिले; तेवढे मात्र आमचे स्वत;चे हे यांना मान्य आहे. " ( रास : 115 ) विंदांच्या ह्या मतावरून ते उच्चतर असे अध्यात्मिक जिणे जगले असे म्हणता येते.

घेता घेता विंदांनी देणाऱ्यांचेच हात कसे घेतले हे देण्याच्या आधीच 11.7.1956 साली ' घेता ' या कवितेमधून संकल्प सोडला होता.ते स्पष्ट होते. कवीचे व्यक्तिगत अनुभव आपली नाळ तोडून कवितेत पसरतात. तेव्हा कवीच्या व्यक्तीमत्वापासून ते बेमालूम होतात; त्यांची रसनाच वाचकागणिक निराळी ठरते. कवीच्या व्यक्तिगत जीवनातून त्यांचा शोध घेऊन आस्वाद घेताना अभिरुचीवर मर्यादा येतात. हे खरे असले तर अभ्यासांती सारे संदर्भ जुळून येत असतील तर तो आस्वाद, शोध घ्यायला काय हरकत आहे?

## *संदर्भ*

1.आठवणींच्या गंधरेखा : गंगाधर गाडगीळ; पॅाप्युलर प्रकाशन , मुंबई , 1993 (प्र. आ )
2.उदगार : गो. वि.करंदीकर : मौज प्रकाशनगृह ,मुंबई, 1996 (प्र. आ )
3.धृपद : विंदा करंदीकर : पॉप्युलर प्रकाशन , मुंबई,2004 (ति. आ )
4.बहुपेडी विंदा – करंदीकरांच्या समग्र साहित्याचे परिशीलन खंड – 1: विजया राजाध्यक्ष :मौज प्रकाशनगृह, मुंबई,2005 (प्र. आ )
5.रास : सुमा करंदीकर : मौज प्रकाशनगृह, मुंबई,1999 (प्र. आ )



***राजशेखर शिंदे***
मराठी विभाग ,दयानंद कॉलेज,सोलापूर.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.org